ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – V February 2014

# ग्रामीण साहित्याची स्थित्यंतरे

प्रा. डॉ. सुनील म. पवार,
ज. ए. इ. चे महिला महाविद्यालय,
स. वा. जोशी विद्यासंकुल,
डोंबिवली (पूर्व) – 421201.

प्रारंभ काळापासून सत्यशोधक समाजातील तसेच या समाजाबाहेरील साहित्यिकांनीही ग्रामीण साहित्याची निर्मिती तुरळक प्रमाणात केलेली दिसून येते. उदा. केशवसुत यांची 'एक खेडे' (1887) सारखी कविता, ह.ना. आपटे यांची 'काळ तर मोठा कठीण आला' (1897 मध्ये पडलेल्या दुष्काळावरील) ही कथा, धनुर्धारी उर्फ रा.वि. टिकेकर यांची पिराजी पाटील (1903) ही ग्रामीण जीवनावरील छोटेखानी कादंबरी यांसारखे साहित्य म्हणजे तत्कालीन ग्रामीण साहित्याच्या पाऊलखुणाच होत. तथापि भारतीय लोकजीवनाचा महत्वाचा भाग ग्रामीण असूनही आधुनिक मराठी साहित्यात ग्रामीण जीवन मात्र 1925 पर्यंत तरी अभावानेच दिसून येते.

महात्मा गांधीजींच्या उदयानंतर मराठी साहित्यात झालेल्या महत्वाच्या परिवर्तनाचा एक भाग म्हणजे ग्रामीण साहित्याची 1925 नंतरच्या काळात होऊ लागलेली लक्षणीय स्वरुपातील निर्मिती. ग्रामीण साहित्य निर्मितीचा 1925 ते 1940 हा दुसरा टप्प मानता येईल. या काळात ग्रामीण साहित्यात कविता, कथा, कादंबरी या प्रकारांत निर्मिती झाली. या ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा एकूण मराठी साहित्याच्या प्रेरणांच्या स्वरुपाशी व त्याच्या स्थितीगतीशी समांतर असलेल्या दिसून येतात. इंग्रजी वाड्.मयातील 'पास्टोरल पोएट्री'चा तसेच निसर्गाकडे पाहण्याच्या काव्यात्म रोमॅंटिक वृत्तीचा, एकूणच मध्यमवर्गीय नागरदृष्टीचा परिणाम ग्रामीण कवितेवर विशेषतः झालेला दिसतो. ग्रामीण कथा–कादंबरीवर गांधीविचारातील निसर्गाच्या महात्मात्ता, 'खेड्याकडे चला'च्या चळवळीचा, जनसामान्याकडे दरिद्रीनारायण म्हणून पाहण्याच्या प्रवृत्तीचा, तसेच समाजवाद, साम्यवाद, ना.सी. फडके यांची आनंदवादी व मनोरंजनवादी वाड्.मयीन दृष्टी, वि.स. खांडेकर यांच्या ध्येयवाद याचा परिणाम विशेष झालेला दिसतो.

ग्रामीण साहित्याचा तिसरा टप्पा 1900 ते 1950 असा दहा वर्षाचा मानावा लागतो. 1940 नंतरचे उल्लेखनीय ग्रामीण साहित्य म्हणजे श्री.म. माटे यांचे उपेक्षितांचे अंतरंग व माणुसकीचा

गहिवर हे कथासंग्रह, र. वा. दिघे यांच्या पाणकळा व सराई यांच्या कादंबऱ्या आणि ग.ल.ठोकळ, म.मा. भोसले, वि.वा. हडप, बी. रघुनाथ प्रभृतींचे कथात्म साहित्य. माटे व दिघे यांच्या लेखनातून या टप्प्यावरील ग्रामीण साहित्यातील दोन प्रमुख प्रवृत्ती व्यक्त होतात. माटे यांच्या लेखनाची प्रवृत्ती प्रबोधनात्मक व सास्तवदर्शी आहे, तर दिघे यांच्या लेखनाची प्रवृत्ती रंजनात्मक व रोमॅंटिक स्वरुपाची आहे. या दोघांच्या प्रयत्नामुळे ग्रामीण साहित्याला वाङ्‌मयीन प्रतिष्ठा मिळण्यास प्रारंभ झाला.

चौथा टप्पा सर्वसाधारणपणे 1950 ते 1960 असा मानला जातो. हा प्राधान्याने नवसाहित्याचा, नव्या कलाजाणिवांच्या उदयाचा कालखंड होय. या नव्या साहित्यदृष्टीचा संस्कार त्या काळातील ग्रामीण साहित्यावर झाला आहे. व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, रणजित देसाई, द.मा. मिरासदार प्रभृती या काळातील महत्वाचे ग्रामीण लेखक होत. ग्रामीण वास्तवाचे सूक्ष्म भान, अनुभवाकडे अनुभव म्हणून पाहण्याची दृष्टी, भाषेसंबंधीची आधुनिक कलात्मक जाणीव यांमुळे त्यांनी घडविलेले ग्रामीण व्यक्तिजीवनाचे व समूहजीवनाचे चित्रण विशेष मूलयुक्त ठरले. याचमुळे या लेखकांचे ग्रामीण साहित्य पूर्वसूरींपेक्षा वेगळेपणाने उठून दिसते.

ग्रामीण साहित्याचा पाचवा टप्पा 1960 च्या आसपास सुरु झाला, असे मानावे लागते. विदर्भातील उद्धव शेळके, मनोहर तूल्हार, मराठवाड्यातील रा. रं. बोराडे, भास्कर चंदनशिव, पश्चिम महाराष्ट्रातील आनंद यादव, चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे, सखा कलाल, चारुता सागर, कोकणातील मधु मंगेष कर्णिक, हमीद दलवाई प्रभृती लेखक या टप्प्यावर लेखन करताना दिसतात. ग्रामीण साहित्याच्या या लेखकांची विविधता ही प्रादेशिकतेची विविधता दर्शविात. त्यामुळे ग्रामीण साहित्यात विविध प्रदेषांतील ग्रामीण जीवनाचे प्रतिबिंब ठळकपणे पडण्यास आणि साहित्यात एक प्रकारचे प्रादेशिक आणि ग्रामीण संतुलन निर्माण होण्यास सुरुवात झालेली दिसते. माडगूळकर, मिरासदार, पाटील, देसाई हे ग्रामीण समाजाच्या वरच्या स्तरातून आलेले साहित्यिक होते; परंतु 1960 च्या आसपास जे नव्या दमाचे ग्रामीण साहित्यिक लेखन करु लागले, ते ग्रामीण समाजाच्या खालच्या स्तरातून आलेले होते, त्यांच्या ग्रामीण साहित्यात जनसामान्यांच्या जीवनाचे गांभीर्याने आणि सूक्ष्मतेने चित्रण आलेले दिसते. त्यात बोलींच्या व अनुभवरुपांच्या दृष्टीने अधिक वैचित्र्यपूर्णता आली. याच काळात आनंद यादव, ना.धों. महानोर, विठ्ठल वाघ यांची वेगळी ग्रामीण कविताही लिहिली जाऊ लागली. 1970 च्या आसपास याच पिढीतील यादव, बोराडे यांच्यासारखे लेखक

आपल्या कादंबऱ्यातून बदलत्या ग्रामीण जीवनाचा वेध घेताना दिसतात. (यादवांची गोतावळा, बोराड्यांची पाचोळा). प्रामुख्याने या लेखकव्दयाने नव्या पिढीला हाताशी धरुन ग्रामीण चळवळ सुरु केली.

1960 नंतर महाराष्ट्रीय समाजजीवनात महत्वाचे स्थित्यंतर घडू लागले. त्याचे परिणाम 1965 नंतरच्या मराठी साहित्यावरही दिसू लागले. 1960 साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर महाराष्ट्र सरकारने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सर्व प्रकारचे शिक्षण जवळ जवळ मोफत केले. त्यामुळे आजवर शिक्षणापासून वंचित असलेल्या ग्रामीण समाजातील विविध स्तरांतून नवशिक्षित तरुणांची पिढी तयार होऊ लागली. ही पिढी झपाट्याने आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक दृष्टींनी तसेच एकूणच जीवनमानाच्या संदर्भातही वेगळेपणाने उठून दिसू लागली. ग्रामीण विभागात एक नव–जागरुक, सुशिक्षित वर्ग तयार होऊ लागला.

या जागृतीचे परिणाम साहित्यक्षेत्रात दिसू लागले. दलित साहित्याची चळवळ 1967 च्या आसपास सुरु झाली. ग्रामीण साहित्याची निर्मिती पूर्वीपासून होत होती, परंतु तिला नवे परिमाण देण्याची गरज निर्माण झाली होती. ग्रामीण समाजातील परिवर्तनामुळे हे नवे परिमाण देणे अत्यावश्यक झाले होते, त्याच्या पाऊलखुणा 1970 पासून तोपर्यंतच्या ग्रामीण साहित्याच्या समीक्षेतून दिसू लागल्या. याचा अंतिम परिणाम 1977 पासून अधिकृतपणे ग्रामीण साहित्याची चळवळ आकाराला येण्यात झाला. ग्रामीण साहित्याचा हा सहावा टप्पा मानावा लागतो.

ग्रामीण साहित्याची चळवळ ही प्रामुख्याने सामाजिक व सांस्कृतिक स्वरुपाची होती. त्या त्या समाजात निर्माण होणाऱ्या साहित्यात त्या समाजाचे सर्वांगीण प्रतिबिंब पडावे, असे या चळवळीचे मुख्य सूत्र होते. या चळवळीची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे–

पूर्वासुरींच्या साहित्याचे नव्याने मूल्यमापन, वर्तमान समजाचे बदलते वास्तव, त्या विषयीचे प्रश्न, समस्या यांचे विवरण, सर्वांगीण लेखनासाठी लेखकाला कोणत्या स्वरुपाचे आत्मभान येण्याची गरज आहे त्याची मीमांसा, नव्या ग्रामीण साहित्याची दिशा कशी असू शकेल त्याचा आलेख काढणे, नव्या लेखकांच्या जाणिवा अधिक समृद्ध करण्यासाठी लेखन–शिबिरे, समीक्षा–शिबिरे, मेळावे, साहित्य संमेलने भरविणे, नवप्रेरणांचे साहित्य व समीक्षा प्रसिद्ध करण्यासाठी माध्यमे उपलब्ध करुन देणे. इत्यादी. यातून स्वातंत्र्योत्तर बदलत्या ग्रामीण समाजवास्तवाचे चित्रण करणारी एक नवी पिढी सिद्ध झाली. 1980 च्या आसपास ती या नव्या प्रेरणांनी लेखन करु लागली. मराठीतील

एकूणच नव्या ग्रामीण साहित्यावर या चळवळीचा परिणाम प्रत्याक्षप्रत्यक्ष स्वरुपात झालेला दिसून येतो.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


1. मराठी साहित्य संज्ञा/समीक्षा कोश : संपा विजया राजाध्यक्ष
2. ग्रागीण साहित्य विशेषांक : डॉ. आनंद यादव
3. ग्रामीण कादंबरी : डॉ. रविंद्र ठाकूर
4. ग्रामीण साहित्य स्वरुप आणि शोध : डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
5. मराठी कथेची स्थितीगती : डॉ. अंजली सोमण
6. संक्षिप्त मराठी वाड.मयकोश : संपा. प्रभा गणोरकर, वसंत आबाजी डहाके
7. ग्रामीण कथाः स्वरुप आणि विकास : वासुदेव गुलाटे
8. ग्रामीण साहित्य : एक चिंतन : द.ता. भोसले
9. ग्रामीण साहित्य आणि वास्तव : डॉ. आनंद यादव